# दिबांच्या नावासाठी रायगड ते मुंबई भव्य मानवी साखळी आंदोलन

दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १६ वे • अंक ७८ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.११ जून २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com



# प्रकल्पग्रस्तांचे ०१ लाख लोकं १० लाख लोकांवर भारी पडतील : लोकनेते रामशेठ ठाकूर

**दै.रायगड नगरी । हरेश साठे**

**पनवेल** : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव देण्यात यावे आणि त्यासाठी सरकारचे लक्ष केंद्रित झाले पाहिजे याकरिता रायगड ते मुंबई अशी भव्य मानवी साखळी आंदोलन आज (दि. १० जून ) करण्यात आले. 'हुतात्म्यांचे रक्त वाया जात नसते, वाया जाऊ द्यायचे नसते' आणि 'संघर्षाशिवाय काहीही मिळत नाही' हे प्रकल्पग्रस्तांचे नेते दि. बा. पाटील यांचे वचन घेऊन हे आंदोलन झाले. दिबांच्या नावासाठी कितीही संघर्ष करावा लागला तरी चालेल, त्यासाठी आम्ही तयार आहोत अशीच भूमिका या आंदोलनात पहायला मिळाली. पनवेल मधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ते सीबीडी बेलापूर अशी तब्बल १२ किमी अंतराची मानवी साखळी बघताना हि दिबांसाठी मानवतेची साखळी असल्याचे अधोरेखित झाले. रायगड, नवी मुंबई, मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यात एकूण जवळपास २०० किमी अंतराची मानवी साखळी उभारण्यात आली होती. यामध्ये जवळपास ४० हजारहुन जास्त जणांनी सहभाग घेऊन मानवी साखळीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.






नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या माध्यमातून झालेल्या या आंदोलनात कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आंदोलनाला सुरुवात झाली. या मानवी साखळीत म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजप नेते वाय.टी.देशमुख महापौर डॉ. कविता चौतमोल, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, उपमहापौर जगदिश गायकवाड, सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जे. डी. तांडेल, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुनिल घरत, माजी उपमहापौर चारुशिला घरत, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, शेकडो संघटना, वारकरी संप्रदाय, कृती समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध पक्षांचे कार्यकर्ते, हजारो नागरिक सहभागी झाले होते.

यावेळी 'विमानतळाला दिबासाहेबांचेच हवे नाव' अशी गर्जना करताना दिबासाहेब झिंदाबाद, दिबासाहेब अमर रहे, अशा गगनभेदी घोषणा देण्यात आल्या. कोविड संदर्भातील सर्व नियम पाळून हे आंदोलन झाले. हवामान खात्याने अतिवृष्टीचा ईशारा दिला होता. त्या अनुषंगाने तसे पडसादही होते मात्र निसर्गसृष्टीला सुद्धा दिबासाहेबांचेच नाव मान्य असल्याने आंदोलकांना पावसाची बाधा पोहचु नये यासाठी वरुणराजाने विश्रांती घेत आंदोलनाला साथ दिली. मानवी साखळीत दिबांचे चित्र असलेले मास्क आणि रक्तररंजित झेंडे, बॅनर, हॅन्ड होर्डिंग्ज लक्षणीय होते. एकूणच या आंदोलनातून २४ जूनला लोकनेते दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनी सिडकोला घेराव घालण्याची पूर्वतयारीही दिसत होती आणि जो पर्यंत दिबांचे नाव नाही तो पर्यंत संघर्ष कायम असल्याचा निश्चय स्पष्ट दिसून आला.

यावेळी बोलताना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले कि, दिबासाहेब महाराष्ट्रातील भूमिपुत्र, शेतकरी, प्रकल्पग्रस्त आम्हा सर्वांची अस्मिता आहे, त्यामुळे दिबासाहेबांचे नाव विमानतळाला दिलेच पाहिजे त्यासाठी आम्ही वाटेल किंमत मोजायला तयार असून २४ जूनला सिडकोला घेराव घालणारच आहोत पण त्यापुढेही वेळ पडल्यास आणखी संघर्ष करायला तयार आहोत, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आवर्जून नमूद केले. विविध समाज, पक्ष, संस्था-संघटना, पत्रकार, यांनीही पाठींबा दिला असल्याचे त्यांनी नमूद केले. स्थानिक आ-गरी पुढाऱ्यांनी दिबांच्या नावाला विरोध केल्याच्या पत्रकारांच्या प्रश्नावर बोलताना सांगितले कि, नवी मुंबई विमानतळाला दिबासाहेबांचे नाव द्यावे यासाठी सभागृहात लावण्यात आलेल्या अभियान बॅनरवर महाविकास आघाडीतील स्थानिक पुढाऱ्यांनी स्वाक्षरी केली होती. पण त्यांची अचानकपणे भूमिका बदलली आणि या स्वार्थी पुढाऱ्यांचे त्यानिमित्त समाजासमोर पितळ उघडे झाले आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले. दिबासाहेबांचे नाव विमानतळाला दिल्यास मुख्यमंत्र्यांचा जाहीर सत्कार करणार असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. आजचे मानवी साखळी आंदोलन प्रशासनाला जाग येण्यासाठी हे पहिले पाऊल असून प्रकल्पग्रस्तांचे ०१ लाख लोकं १० लाख लोकांवर भारी पडतील, असा ईशाराही यावेळी त्यांनी प्रशासनाला दिला.



लोकनेते दि. बा. पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य सर्व समाजासाठी खर्च केले. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी प्रकल्पग्रस्त, शेतकरी, स्थानिक, बहुजन समाजासाठी संघर्ष केला. त्यांच्या संघर्षातून साडेबारा आणि साडेबावीस टक्के आणि अनेक निर्णय प्रस्थापित झाले आणि त्याचा फायदा शेतकरी, प्रकल्पग्रस्त, सर्वसामान्य माणसाला झाला. सरकार कुठलेही असो नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील साहेबांचेच नाव दिले पाहिजे हि आमची कायम भूमिका राहणार आहे. भूमिपुत्राला, शेतकऱ्याला त्याचे हक्क मिळवून देण्याचे अधिकार दिबांमुळे मिळाला. संघर्ष करत करत त्यांनी सर्व भूमिपुत्र शेतकरी, प्रकल्पग्रस्तांना जगायला शिकवले.

**: मा.खा.लोकनेते रामशेठ ठाकूर**



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव दिलेच पाहिजे हि आमची प्रमुख मागणी आहे. आणि यासाठी भूमिपुत्र स्थानिक माणूस, प्रकल्पग्रस्त एकवटलेला आहे. आणि तशी २०१२ सालापासून सगळ्यांची हि मागणी आहे. आणि असे असताना अचानकपणे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे स्व. बाळासाहेबांचे नाव रेटत आहेत. बाळासाहेबांबद्दल सर्वांना आदर आहे, समृद्धी महामार्गाला बाळासाहेबांचे नाव दिले गेले आहे. महाराष्ट्रातील इतर मोठ्या प्रकल्पालाही देता येऊ शकते. लोकनेते दि. बा. पाटील साहेब येथील भूमीपुत्र आहे, हि त्यांची जन्मभूमी कर्मभूमी आहे आणि म्हणून त्यांचे नाव येथील विमानतळाला देणे गरजेचे आहे. भाजप, आरपीआय प्रत्यक्षपणे आंदोलनात सहभागी झाले आहेत. या मानवी साखळीत सर्व पक्षाचे नेते नसतील पण ज्यांना दिबासाहेबांबद्दल आस्था आहे असे कार्यकर्ते सहभागी झाले आहेत, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी आवर्जून उल्लेख केला. एकूणच दिबासाहेबांसाठी सर्वोत्तपरी प्रयत्न आणि संघर्ष करण्यास आम्ही कायम तयार आहोत, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

**: आ.प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष**

## गगनभेदी मागणी

लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाचा आग्रह सुरुवातीपासूनच प्रकल्पग्रस्त शेतकरी, कष्टकरी जनता आणि राजकीय पक्षाचे नेते करीत आले आहेत. कारण दि. बा. पाटील यांची नवी मुंबई ही कर्मभूमी आहे. इथल्या भूमिपुत्रांना, प्रकल्पग्रस्तांना, कष्टकरी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले आहे. १९८४ साली शेतकऱ्यांच्या जमितीला योग्य भाव मिळावा यासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या व देशभर गाजलेल्या शौर्यशाली लढ्यातून शेतकऱ्यांना साडेबारा टक्के विकसित जमीन देण्याचे तत्त्व जे प्रस्थापित झाले ते पुढे संबंध महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना लागू झाले. त्यामुळे दि. बा. पाटील हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे व प्रकल्पग्रस्तांचे लोकनेते होते. पाचवेळा आमदार, दोन वेळा खासदार, विरोधी पक्षनेते, नगराध्यक्ष अशी दमदार कारकीर्द कामगिरी दि. बा. पाटील यांची राहिली आहे. आपल्या बुलंद आवाजाने महाराष्ट्र विधीमंडळात तसेच खासदार म्हणून दिल्लीच्या सार्वभौम संसदेत शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न त्यांनी पोटतिडकीने मांडले. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसाठी आणि त्यानंतर ओबीसी समाजात जागृती करण्यासाठी त्यांनी सारा महाराष्ट्र पिंजून काढला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, सीमा प्रश्न अशा अनेक जनलढ्यात त्यांनी हिरीरीने भाग घेऊन तुरुंगवास भोगला आहे. त्यामुळे त्यांचे हे कार्य नव्या पिढीला स्फूर्तिदायी ठरावे यासाठी त्यांच्या कर्मभूमीत त्यांची स्मृती जागरूक राहावी यासाठी नवी मुंबईत होत असलेल्या विमानतळाला त्यांचेच नाव द्यावे, अशी मागणी विविध पक्षांच्या नेत्यांनी सामाजिक संघटनांनी तसेच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केली असून राज्य सरकारने याचा गांभीर्याने विचार करून नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव द्यावे, अशी गगनभेदी मागणी या मानवी साखळी आंदोलनातून केली.





# नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि.बा.पाटलांचे नाव देण्यासाठी दास्तान फाट्यावर मानवी साखळी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिवंगत लोकनेते नेते माजी खासदार दि.बा.पाटील यांचे नाव द्यावे, या मागणीसाठी काल पनवेल, मुंबई, ठाणे, भिवंडीसह उरणमध्ये जासई येथील उरण-पनवेल महामार्गावर दास्तानफाटा येथे उरण - पनवेल संघर्ष समितीच्या वतीने येथील नेते मंडळी, स्थानिक प्रकल्पग्रत आणि कार्यकर्त्यांनी कोरोना संसर्गजन्य प्रादुर्भावाची दक्षता घेत प्रत्येकाने दोन मीटरचे अंतर राखून काल सकाळी ११:०० शेकडोची संख्येने लांबच्या लांब मानवी साखळी तयार केली होती.



दास्तानफाट्या बरोबर उरण - पनवेल महामार्गावरील करळ उड्डाण पूल, नवघरफाटा, जेएनपीटी वसाहत प्रवेशद्वार, तू.ह.वाजेकर विद्यालय फुंडे, द्रोणागिरी सिडको कार्यालय रोड फुंडे, बोकडविरा, नवीनशेवा येथील प्रकल्पग्रस्त बोकडविरा पोलिस चौकी व कोटनाक्या पासून, राजपाल नाका, गणपती चौक ते वैनोपार्क आणि ठिकाणी कार्यकर्त्यांनी दि.बा.पाटील यांच्या नावाची घोषणाबाजी करीत मानवी तयार साखळी केली होती.

उरणच्या लढवय्या भूमिपुत्रांना लढल्या शिवाय काहीही पदरात पडत नाही. हा १९८४ च्या जासई, दास्तानफाटा येथील गौरवशाली व शौर्यशाली लढयाचा अनुभव याच ठिकाणचा अनुभव येथील प्रकल्पग्रस्तांना न्यात असून, या लढ्याचे नेतृत्व करणारे आणि प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के भूखंड आणि अन्य न्याय्यी मागण्या पदरात पाडण्यासाठी सरकार विरोधात प्रखर भूमिका घेऊन तत्कालीन सरकारला साडेबारा टक्केच तत्व मान्य करायला लावणारे आणि प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनात अखे-रचा श्वास असे पर्यंत वयाच्या ८५ वर्षापर्यंत लढणारे प्रकल्पग्रस्तांचे तारणहार बनलेले दिवंगत लोकनेते दि.बा.पाटील यांचेच नाव नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे. असा निर्धार येथील भूमिपुत्रांनी केला आहे.



या मानवी साखळीचे नेतृत्व उरणचे आ.महेश बालदी यांनी केले व कार्यकर्त्यांना मनोबळ दिले. या मानवी साखळीत मोठा पोलिस फौजफाटा उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र बुधवंत यांच्या आधिपत्याखाली तैनात केल्याने कायदा व सुव्यथेचा प्रश्न निर्माण झाला नाही. याशिवाय उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक माणिक नलावडे यांनी जेएनपीटी बंदराच्या अनुषंगाने सुरू असलेली अवजड व अन्य वाह-तूक सुरळीत ठेवण्याच्या नियोजनामुळे कोणतीही अडचण निर्माण झाली नाही. दि.बा. पाटील यांच्या नावासाठी करण्यात आलेल्या मानवी साखळीची दास्तानफाट्या पासून शेवटी उरण शहरातील पद्मभूषण नारायण विष्णू धर्माधिकारी नगरपरिषद प्रार्थमिक शाळा उरण येथे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सांगता करण्यात आली.

# धन्य झाली भेटी...

सत्तेसाठी केलेली धडपड राजकारणात क्षम्य असते. थंड बसणे हा गुन्हा समजला जातो. सत्तेची हाव नाही, असे म्हणत आतल्या दाराने मार्ग प्रशस्त करण्याची शक्कल गुणांमध्ये मोजली जाते. मागचे युती सरकार स्थापन होण्याआधी राष्ट्रवादी काँग्रेसने देऊ केलेला पाठिंबा, हा त्याच खेळीचा भाग होता. 'थांबला तो संपला' हे सूत्र तंतोतंत राबविताना, राजकारणात वेगवेगळ्या युक्त्या अमलात येत असतात. त्या यशस्वी झाल्या नाहीत, म्हणून पुढचे प्रयास जे थांबवितात, त्यांना लोक मुरब्बी राजकारणी मानत नाहीत. महाराष्ट्र हे सध्या असा अफलातून मुरब्बीपणा राबविण्याचे आगर बनले आहे. 'राष्ट्रवादी'च्या गटासोबतची सत्ता स्थापनेची भाजपची पहाटखेळी फसली असली, तरी लवकरच चमत्कार घडेल, अशा आशयाच्या बातम्या त्याच प्रयत्नवादातून कानी येत असतात. 'दोन महिन्यांत आपले सरकार,' हा विषय ऐकून अंगात नवा उत्साह संचारून घेण्याचे धोरण भाजपच्या कार्यकर्त्यांनी अद्यापही थांबविलेले नाही. 'प्रयत्न फसला असला, तरी आमचा अजित पवारांवर रोष नाही. विश्वासघात करणाऱ्या शिवसेनेवर राग आहे,' असे वक्तव्य भाजपच्या प्रदेशाध्यक्षांनी एकीकडे करायचे आणि केंद्रीय नेत्याने रुष्ट मुख्यमंत्र्यांना एकांतातील चर्चेला वेगळा वेळ द्यायचा, ही राजकारणातील प्रयत्नवादाचीच पायरी आहे. महाविकास आघाडीच्या त्रिमूर्तींनी नवी दिल्लीत जाऊन पंतप्रधानांची भेट घेण्यामागे काही जाहीर; काही संभाव्य संदर्भ दडले आहेत. देवेंद्र फडणवीस यांना सध्या तरी माजी मुख्यमंत्री म्हणून वावरावे लागत आहे. दिल्लीवारीला फडणवीस यांच्या शरद पवारांच्या गृहभेटीची पार्श्वभूमी आहे. त्या भेटीने आधी कुतूहल वाढविले. मोदी-ठाकरे चर्चेने अनेकांची धडधड वाढली. राज्यातील भाजपला शिवसेनेच्या पावित्र्याची चीड आहे. विरोधी पक्ष म्हणून काम करताना ज्यांच्यावर त्यांनी सर्वाधिक हल्ले केले, त्या अजित पवारांना पहाटे उठून पवित्र करून घेण्याची भाजपची तयारी आहे; मात्र काँग्रेससोबत जाऊन शिवसेनेने दिलेला मनस्ताप ते विसरायला तयार नाहीत. अमित शहांच्या 'मातोश्री'वरील भेटीपासून भाजप-शिवसेनेतील अंतर वाढले. त्या भेटीत उद्धव यांनी देवेंद्र फडणवीस यांना बाहेर ठेवून, अमित शहांशी व्यक्तिगत चर्चा केली होती. दिल्ली भेटीत मोदींनी अजित पवार, अशोक चव्हाणांना प्रतीक्षालयात बसवून गुप्त चर्चेचा 'स्तर' देशापुढे जाहीर केला. कुणाला कोणत्या वेळी किती महत्त्व द्यायचे, हे गणित राजकारणात मोलाचे असते. एकीकडे पवारांचे दिवस संपले, असे म्हणणारे फडणवीस त्यांचीच स्नेहभेट घेतात. त्याच वेळी, मोदींची ठाकरेंशी स्वतंत्र गुप्त चर्चा होते, हा अनुक्रम चर्चांना चालना देणारा आहे. 'मी नवाझ शरीफांना भेटलेलो नाही,' हा मुख्यमंत्री ठाकरे यांचा त्रागा अशा वेळी समजून घ्यायचा असतो. खुंटलेल्या संवादाच्या शुभारंभाबद्दल फडणवीसांनी वर्तविलेल्या सकारात्मकतेचा काटकोन शोधण्याचा प्रयत्नही थांबवायचा नसतो. राज्य सरकारला अडीच वर्षे होताच, नेतृत्वबदलाची मागणी 'राष्ट्रवादी'कडून रेटली जाईल का, उद्धव ठाकरे असले तरी गैरपक्षातील सलग यशस्वितता पवार स्वीकारतील का, तात्कालिक तडजोड म्हणून अंगिकारलेल्या शिवसेनेच्या साहचर्याला पाच वर्षांचे पूर्ण सत्र देणे काँग्रेसला अनुकूल ठरेल का, अशा एक ना अनेक चर्चांचे बूच एका गुप्त भेटीने उघडले आहे. भाजपला सत्तेबाहेर ठेवण्याच्या एकमेव पर्यायातून एकत्र आलेल्या तीनही पक्षांनी अगदी अलीकडेपर्यंत गाडा नेकीने सांभाळला. आधी ऑटो रिक्षा म्हणून हिणविल्या गेल्यानंतरही म्हणावे तसे सत्तेतील वाद उघड झाले नाहीत. सचिन वाझे प्रकरणाने राजकारणाची दिशा बदलली. कोंडी, घुसमट आणि टोकाच्या विरोधाला सरावलेल्या राज्यातील नेत्यांना आकस्मिक केंद्रीय कारवाईचा धोका सतावू लागला. काही तरी सकारात्मक घडेल, हा उद्धव ठाकरे यांचा बैठकीनंतरचा विश्वास शिवसेनेच्या घटकपक्षांचा त्रास वाढवू शकतो. वादळी फटक्यानंतर केंद्राकडून गुजरातला लाभलेली उदारता महाराष्ट्राच्याही वाट्याला यावी, या काँग्रेसने व्यक्त केलेल्या अपेक्षेतून आंतरिक उपेक्षेचे कढ दिसले आहेत. राज्याच्या जीएसटी रकमेपासून मराठीच्या अभिजात दर्जापर्यंतच्या विविध मागण्यांवर भेटीत चर्चा झाल्याचे कळते. या दिल्लीवारीतून राज्यपालनियुक्त बारा जागांचा तिढा संपेल, असे नाही. भाजपने अचानक पाळलेल्या सौजन्य पंधरवड्याने हिरमुसल्या नेत्यांना संजीवनी दिली; पण केंद्राला हवा असलेला चमत्कार वाटतो तेवढा सोपा नाही. दिल्लीतील चाणाक्ष नेत्यांच्या तावडीतून पाच वर्षांचा सहीसलामत किनारा गाठणेही जिकरीचे आहे. 'नाते तुटलेले नाही' हे मुख्यमंत्र्यांचे उद्गार ऐकून काहींचे घसे तृप्त झाले. काहींना तहान लागली. 'धन्य झाली भेटी, नाचू वाळवंटी' अशी अवस्था मात्र नक्कीच नाही. बंदद्वार चर्चेतील गैरसमजानेच शिवसेनेची भूमिका बदलली होती. कुणाचे सौजन्य फळाला येते हे दिसेल. तोपर्यंत 'कोण आपला कोण गैर' म्हणत बदलत्या नात्यांची मुक्त सैर सुरू असेल.

# नवी मुंबई विमानतळाला दि.बा पाटील यांचे नाव देण्यासाठी सहभाग



**दै.रायगड नगरी । कर्जत**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला माजी खासदार लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी सर्व पक्षीय कृती समितीच्या वतीने रायगड जिल्ह्यात १० जून रोजी ठीक ठिकाणी मानवी साखळी आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. कर्जत तालुक्यतील नेरळ येथील हुतात्मा स्मारक ते मानिवली येथील हुतात्मा स्मारक पर्यंत मानवी साखळी आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनात हजारो भूमिपुत्र, नागरिक, तरुण, महिला सहभागी होऊन हे आंदोलन यशस्वी करण्यात आले.

गुरुवार दि.१० जून रोजी नेरळ शहरातील हुतात्मा स्मारकात हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या पुतळ्याना पुष्पहार अर्पण करून या आंदोलन सुरुवात करण्यात आली. नेरळ हुतात्मा स्मारक ते मानिवली येथील हुतात्मा स्मारक असे सुमारे १२ किलोमीटर पर्यंत हे मानवी साखळी लावून हे आंदोलन करण्यात आले. यावेळी तरुणांनी हातात झेंडे, फलक घेऊन घोषणाबाजी करत आंदोलन यशस्वी केले.

या आंदोलनात आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष सावळाराम जाधव, सुरेश टोकरे, मंगेश म्हसकर, राजेश भगत, अरुण कराळे, बाबीताई शेळके, रमेश मुंढे, मनीषा दळवी वसंत भोईर, अंकुश दुर्गे, शंकर घोडविंदे, सुनील गोगटे, अशोक ओसवाल, ज्ञानेश्वर भगत, महेश कोळंबे,कृष्णा हाबळे, गोरख शेप, शिवराम तुपे, विजय पाटील, राजू हजारे, वैभव भगत, सुधाकर डायरे, बबलू डायरे, प्रवीण शिंगटे, मनिष राणे, संदीप म्हसकर,विष्णू कालेकर, अतुल चंचे, जयेंद्र कराळे, जयवंत हाबळे नेरळ शहर माजी अध्यक्ष अनिल जैन अनिल पटेल माथेरान शहर अध्यक्ष विलास पाटील भोसले दहिवली ग्रामपंचायत सरपंच चिधू तरे यंशवत भवारे आदी या आंदोलनात सहभागी झाले होते.

सकाळी १० वाजल्यापासून दुपारी १२ पर्यंत नेरळ, साईमंदिर, धामोते, दहिवली, मालेगाव, अवसरे, कोदिवले, मानिवली अशा अनेक ठिकाणी हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाची सांगता मानिवली येथील हुतात्मा स्मारकात करण्यात आली त्यानंतर सर्व पक्षीय कृती समितीच्या वतीने कर्जत तहसीदार यांना नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील साहेबांचे नाव देण्या संदर्भात निवेदन देण्यात आले.



**शिवस्वराज्य दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत खेरणे तर्फे दरवर्षीप्रमाणे इतर मागासवर्गीय लोकांना मोफत भात बियाणे वाटप करण्यात आले. यावेळी सरपंच सौ.मिनाक्षी हरिश्चंद्र तांबडे, उपसरपंच प्रल्हाद बाळाराम म्हात्रे, ग्रामसेवक पी.पी.वानखेडकर व सर्व सदस्य, सदस्या उपस्थित होते.**

# पनवेल तालुक्यातील स्नेहकुंज वृध्दाश्रमातील अपंग व जेष्ठ नागरिकांच्या लसीकरणास प्रारंभ

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी रायगड जिल्हयामधील सर्व वृध्दाश्रम, आदिवासी, अपंग, अंथरुणात असलेले रुग्ण, अशा सर्वांचे लसीकरण प्राधान्याने करण्याबाबत सर्व तहसिलदार, गट विकास अधिकारी, प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास, मुख्याधिकारी नगरपरिषद यांना आदेशित केले होते.

त्यानुषंगाने या लसीकरण मोहिमेस पनवेल तालुक्यामधून सुरुवात झाली असून दि. ०९ जून रोजी स्नेहकुंज आधारगृह नेरे येथील २० वयोवृध्द व अपंग नागरिकांचे लसीकरण पूर्ण करण्यात आले.

ज्या नागरिकांकडे पुरावे नाहीत त्यांचे आधारकार्ड तयार करण्याचे कामही प्राधान्याने सुरु करण्यात आले आहे. लसींची उप-लब्धता ज्या प्रमाणात होईल त्याप्रमाणे पनवेल तालुक्यामधील उर्वरीत १२ आश्रमातील सर्व लोकांचे लसीकरण सर्व शासकीय यंत्रणांच्या समन्वयातून प्राधान्याने करण्यात येणार आहे, अशी माहिती पनवेल तहसिलदार श्री.विजय तळेकर यांनी दिली आहे.

या मोहिमेसाठी सामाजिक जाणीवे-तून हिंदाल्को कंपनी, तळोजा व स्नेहकुंज आधारगृहाच्या संचालिका श्रीमती संगिता जोशी व नितीन जोशी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# विद्युत महामंडळाचा अजब कारभारला जबाबदार कोण?

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील काही ग्रामीण भागा-तील जनतेला पावसाळा सुरू होतातच विद्युत पुरवठा असतांना देखील रात्रंदिवस अंधाराशी सामना करावा लागत आहे अशा या विद्युत महामंडळाच्या गलथान कारभाळाला जबाबदार कोण असा संतप्त सवाल तालुक्यातील उदडवने, मालसई, धामणसई, मेढा विभागातील जनता जनार्दन यांनी केला आहे ,

रोहा तालुक्यातील विद्युत महामंडळाचा कारभार आहे तरी कसा पावसाळा सुरू होताच नागरिकांना करावा लागतो अंधाराशी सामना वेळोवेळी विद्युत वीज पुरवठा खंडित याला जबाबदार कोण त्यामुळे अनेक ग्रामीण भागातील जनतेची कायम बोंब असल्याने तालुक्यातील उदडवने, सांगडे, मुठवली, मालसई गावठाण, सोनगाव, धामणसई, पिंगळसई सह मेढा विभागात गेली तीन चार दिवस वेळोवेळी विद्युत पुरवठा खंडित होत असून भर पावसाळ्यात हा विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने काही गावे अत्यन्त डोंगर पायथ्याशी असल्याने त्यांना अंधाराशी सामना करावा लागत असल्याचा संताप या विभातील नागरिकांकडून केला जात आहे.

पावसाळा डोक्यावर आला की विद्युत महामंडळाचे कर्मचारी विद्युत पुरवठा करणाऱ्या वाहिनीवर आलेल्या झाडांच्या फांद्या तोडायला जातात संपूर्ण उन्हाळा निघून जातो तेव्हा हे खाते निद्रवस्थेत असते का असा सवाल उठला आहे तसेच लाईट बिल भरण्यास विलंब झाला तर संबधित अधिकारी वर्ग कर्मचारी वर्गाला आदेश देत ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडित करतात मात्र आजच्या घडीला वारंवार वीज गायब होत येथील जनतेला अंधाराशी सामना करावा लागतो याला जबाबदार कोण असा संताप जनक सवाल येथील नागरिक करत आहेत.

# बंदी असतानाही मासेमारी करण्यास बोटी समुद्रात

**दै.रायगड नगरी । उरण**

पावसाळी मासेमारीस बंदी असतानाही उरण परिसरातील काही बोटी मासेमारी करण्यासाठी जात असल्याची माहिती अधिकृत सूत्राकडून समजते. अधिकारी वर्गांनी याची चौकशी करून मासेमारीस जाणाऱ्या बोटींवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

१ जून ते ३१ जुलै २०२१ पर्यंत राज्यात यांत्रिक मासेमारी बोटींना पावसाळी मासेमारी बंदी घालण्यात आली आहे.या कालावधीत मासळीच्या जीवांना प्रजोत्पादनास पोषक वातावरण असते.या कालावधीत मासेमारी बंदीमुळे मासळीच्या बीज निर्मिती प्रक्रियेस वाव मिळुन मासळीच्या साठ्याचे जतन होते.तसेच या कालावधीत खराब व वादळी हवामानामुळे होणारी मच्छिमारांची जीवित व वित्त हानी मासेमारी बंदीमुळे टाळता येणे शक्य होते. त्यामुळे कोकण किनाऱ्यावरील शेकडो मच्छिमार



बोटी आपापल्या बंदरात नांगर टाकून उभ्या करण्यात आल्या आहेत.

मासळीच्या साठ्याचे जतन तसेच मच्छिमारांचे जीवित व वित्त यांचे रक्षण या हेतूने या वर्षी १ जून ते ३१ जुलै २०२१ या कालावधीत राज्यात सागरी क्षेत्रात सागरी किनाऱ्या पासून १२ सा-गरी मैलापर्यंत यांत्रिक मासेमारी बोटींना पावसाळी मासेमारी बंदी करण्यात आली आहे.

मासेमारीस बंदी असतानाही उरण परिसरातील काही बोट मालक काही अधिकारी वर्गाशी संधान बांधून मासेमारी करण्यासाठी बोटी पाठवीत असतात. सदर बोटी मासेमारी करण्यासाठी जाऊन २ ते ३ दिवसांत परत येत आहेत. तसेच मासळी घेऊन आल्यानंतर ज्या ठिकाणी उतरवली जाते त्या ठिकाणी जाणारा रस्ता वाहांनाना बंद केला जातो. जेणेकरून कोणी येऊ अथवा याची माहिती बाहेर समजू नये यासाठी हा सारा खटाटोप सुरू असतो अशी माहिती तेथील एका नाखवांनी नाव न छापण्याच्या अटीवर दिली. गेल्या वर्षी ४० ते ४५ बंदी काळात मासेमारी करणाऱ्या बोटींवर कारवाई करणात आली होती. त्यामुळे बंदी असतानाही मासेमारी करणाऱ्या बोटींची व त्यांच्या मालकांची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास व परवाना अधिकारी यांनी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# महाविकास आघाडी सरकार देश व राज्यात प्रतिनिधीत्व करण्याचे काम करेल : शरद पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या २२ व्या वर्धापन दिनानिमित्त पक्षाच्या मुख्यालयात कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी नेते आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. आपण २२ वर्षांपूर्वी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आणि संघर्षाची भूमिका स्वीकारली. आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने या २२ वर्षांचा आढावा आपण घेतोय असं पवारांनी सांगितले.

शरद पवार म्हणाले की, आज एका वेगळ्या विचारांचं सरकार आपण स्थापन केलं आहे. कधी कुणाला पटलं नसतं की सेना आणि आपण एकत्र काम करू शकू. पण आपण ते केलं. पर्याय दिला आणि सुदैवाने तो पर्याय लोकांनी स्वीकारला. तिन्ही पक्षाच्या लोकांनी या पर्यायाच्या बांधीलकीतून योग्य रीतीने पावलं टाकायला सुरुवात केली. आणि परिणामस्वरूप हे महाविकास आघाडी सरकार उत्तम रीतीने काम करतंय. कुणी काहीही म्हणो, हे सरकार टिकेल आणि पाच वर्षे काम करेल. नुसतं पाच वर्षेच नाही तर उद्याच्या लोकसभा आणि विधानसभेला अधिक जोमाने एकत्रित काम करून सामान्य जनतेत प्रभावीपणे देश व राज्यात प्रतिनिधीत्व करण्याचं हे सरकार काम करेल याबाबत





माझ्या मनात शंका नाही असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तसेच या सर्व संकटाच्या कालखंडात आपण थांबलो नाही, डगमगलो नाही. आपण करोनाला सामोरे गेलो. शेवटच्या माणसापर्यंत अन्नधान्य पोहचेल याची आपण खबरदारी घेतली. सरकारचे कार्यक्रम राबवण्यात आपण सगळे यशस्वी झालो. यापुढे महाराष्ट्राची जबाबदारी सांभाळण्याची कुवत असलेली एक पिढी आज राष्ट्रवादीमधून तयार होत आहे आणि त्यांना प्रोत्साहित करण्याचे काम आपण केले पाहिजे. या नेतृत्वाच्या फळीमागे सामान्य माणूस विश्वासाने उभा राहून त्यांची बांधिलकी कायम टिकवण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. म्हणूनच मला स्वतःला राष्ट्रवादीच्या भवितव्याविषयी चिंता वाटत नाही. तुमची सत्ता ही अधिक हातांमध्ये गेली पाहिजे. सत्ता ही विक्रेंदित झाली, केवळ एकाच ठिकाणी सत्ता राहिली की ती भ्रष्ट होते. सत्ता भ्रष्ट व्हायची नसेल तर ती सत्ता अधिक लोकांच्या हातामध्ये गेली पाहिजे. हे सूत्र आपल्याला मान्य असेल तर एससी, एसटी, ओबीसी या प्रत्येक घटकाला मी सत्तेचा वाटेकरी आहे, हे वाटले पाहिजे, ते कृतीत आणण्याची काळजी आपण घेतली पाहिजे असंही शरद पवार म्हणाले. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष समाजातील उपेक्षित घटकांच्या केवळ पाठीशी उभा राहातो असं नाही तर त्यांच्याकडे निर्णय घेण्याची प्रक्रिया सुपूर्द करून त्यांच्यामार्फत सर्व घटकांचे प्रश्न सोडवून घेण्याचा प्रयत्न करतो, या वर्गात नेतृत्वाची फळी तयार करतो, हे चित्र आपण निर्माण करणं आवश्यक आहे. त्यातूनच संबंध देशाला एक नवीन रस्ता दाखवूया असं आवाहनही शरद पवार यांनी नेते आणि कार्यकर्त्यांना केले आहे.

# लॉकडाऊन नंतर मिनिट्रेन शटलच्या फेऱ्यात वाढ करावी : प्रेरणा सावंत

**दै.रायगड नगरी । माथेरान**

सध्या लॉक डाऊन मध्ये अमन लॉज ते माथेरान स्टेशन दरम्यान मिनिट्रेन शटल सेवेच्या दोन फेऱ्या होत आहेत. लॉक डाऊन मुळे पर्यटकांना बंदी घालण्यात आली आहे त्यामुळे स्थानिक नागरिक या सेवेचा लाभ घेत आहेत. परंतु केवळ दोन फेऱ्या असल्यामुळे संध्याकाळी नागरिकांना पायी चालत यावे लागते. लवकरच १५ जुननंतर माथेरान अनलॉक करण्यासाठी जिल्हाधिकारी रायगड यांनी संकेत दिले आहेत.



त्यामुळे पावसाळ्यात इथे पर्यटकांची मोठया प्रमाणावर गर्दी होणार आहे. याच पार्श्वभूमीवर अमनलॉज स्टेशन ते माथेरान स्टेशन दरम्यान कमीतकमी सहा ते आठ फेऱ्या करण्यात याव्यात जेणेकरून इथे पावसाळ्यातील निसर्गाचा मनमुराद आनंद घेण्यासाठी शटल सेवेचा लाभ होऊ शकतो. दस्तुरी नाक्यावर खाजगी अथवा स्वतःच्या वाहनाने पर्यटक आल्यास त्यांना दस्तुरी नाक्यापासून गावात येण्यासाठी स्वस्त दरात शटल सेवा हाच एकमेव पर्याय आहे. त्यामुळे इथे अधिकाधिक पर्यटकांची संख्या वाढून इथल्या स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी शटल सेवेच्या फेऱ्यात वाढ करावी या आशयाचे निवेदन माथेरान नगरीच्या विद्यमान नगराध्यक्षा तथा उत्तम प्रशासक प्रेरणा प्रसाद सावंत यांनी मावळ मतदार संघाचे कार्यशील खासदार श्रीरंग बारणे आणि रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक याना दि.१० रोजी निवेदन सादर केले आहे. त्यामुळे या शटल सेवेच्या फेऱ्यात वाढ झाल्यानंतर निश्चितच पर्यटन वाढून सर्वांच्या उत्पन्नात भर पडणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून लक्ष्मी वसाहतीमध्ये औषध फवारणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावर नियंत्रण मिळविण्याच्या दृष्टीने पनवेल महानगरपालिका सर्वतोपरी प्रयत्न करीत असून त्याचाच एक भाग म्हणून एस.टी.स्टॅण्ड परिसरात असलेल्या लक्ष्मी वसाहतीसह इतर झोपडपट्टीमध्ये औषध फवारणी घराघरात जावून करण्यात आली.

महापालिका क्षेत्रामध्ये कोरोनाची दुसरी लाट ओसरत असली तरी संकट असजून टळले नाही आहे. त्याअंतर्गत आमदार प्रशांत ठाकूर आणि सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १९ मधील नगरसेवकांच्या माध्यमातून लक्ष्मीवसाहती मध्ये फवारणी करण्यात आली. या वेळी नगरसेवक अनिल भगत, राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, रुचीता लोंढे, कार्यकर्ते चंद्रकांत मंजुळे यांच्यासह नागरीक उपस्थित होते.

## कॅन्सरग्रस्त ऋचिता माळी हिस आर्थिक मदतीचे आवाहन

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील वरवठणे(ता.रोहा) या गावातील कु. ऋचिता माळी हिस कॅंसर झाला असून तीचे वडील संतोष माळी यांची आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्यामुळे दानशूर व्यक्तिमत्वांनी त्यांना आर्थिक मदत करावी असे आवाहन संतोष माळी कुटुंबियांकडून करण्यात आले आहे.

कु. ऋचिता संतोष माळी ही इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेत आहे. सदरची मुलगी ही आपले शिक्षण घेताघेता गेली दोन वर्षापासून कबड्डीच्या माध्यमातून नाव लौकिक मिळवित असताना अचानक तीचा भाऊ संकेत माळी हा मुंबई या ठिकाणी कामावर जात असताना गडब तालुका पेण येथे अपघात जखमी झाला. त्यानंतर संकेत बरा होतो ना होतो त्याचवेळी ऋचिता आजारी पडली. त्यात ऋचिता हिस कॅंसर असल्याचे निदान झाले. ऋचिताचे वडील संतोष माळी हे रोजंदारीने कामाला जातात त्यामुळे त्यांची घरची परिस्थिती हलाकीची आहे. के.ई.एम.मुंबई येथील हास्पिटलमध्ये ऋचीता माळी हीच्या उपचारासाठी चार लाख रुपयांची आवश्यकता आहे. कु. ऋचिताच्या उपचारासाठी आर्थिक स्वरूपात मदतीची आवश्यकता असून दानशूर व्यक्तिमत्वांनी मदतीसाठी संतोष माळी ( मो. नं. ९३७०८३२२३० ) व संकेत माळी ( मो. नं. ९६१९४३१४१२) आदींना संपर्क साधावा किंवा संतोष पांडुरंग माळी बँक आँफ बडोदा- खाता नंबर -९९८९०१०००१०७२९ ( IFSC CODE NO- ४०२०१२५११) या बँकेच्या खात्यात पैसे जमा करून आम्हास सहकार्य करावे असे आवाहन संतोष माळी कुटुंबियांकडून करण्यात आले आहे.


# प्रदेश कॉंग्रेस ओबीसी सेल अध्यक्षांच्या दौऱ्यात तालुका कॉंग्रेसने मांडल्या व्यथा

## उरण कॉंग्रेस मधील पक्षांतर्गत दुफळी चव्हाट्यावर!

**दै.रायगड नगरी । उरण**

ओबीसी आरक्षण, समाजासाठी असलेल्या विविध योजनांची माहिती देऊन राज्यभर जनजागृती मोहीम राबविण्याची सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश ओबीसी सेल अध्यक्ष भानुदास माळी यांनी उरण येथील कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना दिली आहे. ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नांवर जनजागृती आणि कार्यकर्ता भेटी-गाठी संवाद व नवीन पदाधिकारी नेमणूकबाबत चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस ओबीसी सेल अध्यक्ष भानुदास माळी यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार महाराष्ट्र दौऱ्याला सुरुवात केली आहे.

या दौऱ्यात त्यांनी काल उरण तालुक्यातील कॉंग्रेस पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी संवाद साधला.



याप्रसंगी महाराष्ट्र खादी ग्रामोद्योगचे अध्यक्ष नंदकुमार कुंभार, प्रदेश कॉंग्रेस ओबीसी सेल सरचिटणीस बाळाराम वास्कर, कॉंग्रेस जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, तालुका अध्यक्ष जे.डी.जोशी, प्रदेश कॉंग्रेस ओबीसी सरचिटणीस उमेश भोईर, कॉंग्रेस शहर अध्यक्ष किरीट पाटील, ओबीसी प्रदेश सदस्य संतोष रसाळकर, उरण कॉंग्रेस महिला अध्यक्षा रेखा घरत, महिला जिल्हा उपाध्यक्ष संध्या ठाकूर, अखालाक शिलोत्री, सदानंद पाटील आदी कार्यकर्ते, उपस्थित होते.

यावेळी कॉंग्रेस जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, तालुका अध्यक्ष जे.डी.जोशी यांनी पक्षातील दुफळीच्या व्यथा मांडल्या. पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या विविध मागण्यांकडे वरिष्ठ पातळीवरून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. कार्यकर्त्यांनाच वरिष्ठांचे बळ मिळत नाही.त्यामुळे पक्षांचे बळ वाढणार कसे आणि पक्ष वाढीसाठी प्रयत्न करणार असा सवाल करुन स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या व्यथा वरिष्ठांपर्यत पोहचविण्यात याव्यात अशी मागणी केली.

उरण तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या व्यथा वरिष्ठांपर्यत पोहचविण्यात येतील. तसेच त्यांना पक्षीय बळ मिळविण्यासाठीही प्रयत्न करण्यात येतील असे आश्वासन महाराष्ट्र प्रदेश ओबीसी सेल अध्यक्ष भानुदास माळी यांनी उरण तालुक्यातील उपस्थित कॉंग्रेस पदाधिकारी, कार्यकर्त्यांना दिले. तसेच ओबीसी समाजासाठी असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती कार्यकर्त्यांनी जनतेपर्यंत पोहचविण्याचे आवाहनही माळी यांनी केले. यानंतर माळी यांनी पत्रकारांशी संवाद साधला. पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देतांना मराठी समाजाच्याआरक्षणासाठी महाआघाडीने सरकार सकारात्मक पावले उचलली आहेत. प्रश्न तातडीने सुटण्यासाठी कॉंग्रेसही सर्वोतोपरी प्रयत्न करत असल्याचेही माळी यांनी सांगितले.

# दुय्यम निबंधक कार्यालयाला सार्वजनिक बांधकाम खात्याने वाऱ्यावर सोडले

## पहिल्याच पावसात कार्यालयात गुडघाभर पाणी

**दै.रायगड नगरी । पेण**

शासनाला कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळवून देणाऱ्या पेण येथील दुय्यम निबंधक कार्यालयाला पहिल्याच पावसाचा जोरदार फटका बसला असून या कार्यालयात गुडघाभर पाणी साचले आहे. यामुळे या कार्यालयाचे कामकाज काही काळाकरता ठप्प झाले होते.

पेण येथील दुय्यम निबंधक कार्यालयाचे निबंधक अधिकारी संजय घोडजकर यांनी तातडीने भर पावसात उभे राहून सदरच्या कार्यालयावर स्वखर्चाने प्लास्टिक टाकून तात्पुरती डागडुजी करून घेतली आहे. त्यामुळे या कार्यालयाचे कामकाज पुन्हा सुरू होऊ शकले.

यासंदर्भात दुय्यम निबंधक अधिकारी संजय घोडजकर यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, मागील अनेक वर्षांपासून सदरच्या कार्यालय करिता नवीन इमारत बांधण्यात यावी अशी मागणी वरिष्ठ कार्यालयाकडे वारंवार केली आहे. त्याकरिता निधी सुद्धा उपलब्ध आहे. कार्यालयाला करिता जागा हस्तांतरित करावी अशी मागणी केली आहे. त्याच प्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे गळक्या कार्यालयाच्या दुरुस्तीकरिता वारंवार लेखी पत्रे देऊनही त्यांनी याची दखल घेतली नाही. याउपर सार्वजनिक बांधकाम विभागाने काळजी घ्यावी अशी लेखी सूचना केल्याची माहिती घोडजकर यांनी दिली. तसेच मागील ३ वर्षापासून आपण स्वखर्चाने या कार्यालयाची डागडुजी करत असल्याची माहिती त्यांनी दिली.

सदरच्या कार्यालयाची इमारत जुनी असल्याने आता त्या ठिकाणी तातडीने नवीन इमारत बांधणे गरजेचे आहे. अन्यथा अपघात होण्याचीही शक्यता नागरिकांकडून वर्तवण्यात येत आहे.



# श्रीवर्धन शहरातील रस्ते खड्डेमय, वाहनचालक त्रस्त



**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन शहरातील अनेक रस्ते खड्डेमय झाले असून या खड्ड्यांमधून वाहन चालवताना वाहन चालकांना अक्षरशः कसरत करावी लागत आहे. अनेक वेळा दुचाकी स्वार खड्डा वाचवण्यासाठी आपली स्वतःची बाजू सोडून चुकीच्या बाजूने वाहन घेऊन जात असल्यामुळे समोरून दुसरे वाहन आल्यास अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

श्रीवर्धन शहरातील बागवान मशीद ते श्रीवर्धन समुद्रकिनारा रस्ता अनेक ठिकाणी खड्डेमय झालेला आहे. या रस्त्यावरून नियमित प्रमाणे वाहतुकीचे प्रमाण जास्त असते. तसेच केळस्कर पाखाडी,ओजाळे पाखाडी, जीवनेश्वर पाखाडी व महेश्वर आळी या ठिकाणचे रस्ते देखील खड्डेमय झाले आहेत. हे खड्डे मय झालेले रस्ते नगरपरिषदेकडून गणपतीच्या अगोदर बुजवले जातात. मात्र सप्टेंबर महिन्यापर्यंत वाहनचालकांना खड्डे बुजवण्याची वाट पाहावी लागते एक विशिष्ट प्रकारचे केमिकल व खडी मिक्स केल्यानंतर खड्डे चांगल्या प्रकारात बुजवले जातात. श्रीवर्धन नगर परिषदेकडे सदरचे केमिकल नेहमी उपलब्ध असते. तरी श्रीवर्धन नगरपरिषदेने श्रीवर्धन शहरातील खड्डे तात्काळ बुजवावेत अशी मागणी शहरातील वाहनचालकांकडून केली जात आहे.

# कामगार उपायुक्त कार्यालयामार्फत जनजागृती मोहिमेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त बालकामगार या सामाजिक अनिष्ट प्रथेचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने समाजामध्ये जागृती निर्माण व्हावी, याकरिता शासनाच्या विविध विभागामार्फत विविध स्तरावर प्रयत्न केले जात आहेत.

दि.१२ जून रोजी जागतिक बालकामगार विरोधी दिनाचे औचित्य साधून कामगार उप आयुक्त, रायगड-पनवेल कार्यालयामार्फत सध्याची करोना परिस्थिती लक्षात घेता ऑनलाईन वेबिनारच्या माध्यमातून जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यानुषंगाने सर्व औद्योगिक संघटना असोसिएशन, व्यापारी असोसिएशन, हॉटेल असोसिएशन, क्रिडाई- बांधकाम व्यवसायातील मालक असोसिएशन व वीटभट्टी असोसिएशन, सर्व शासकीय / निमशासकीय संस्था, नागरिक यांनीही या अनिष्ट प्रथेचे उच्चाटन करण्याकरिता जनजागृती करुन या मोहिमेत सहभाग नोंदवावा व रायगड जिल्हा बालकामगार मुक्त करण्याकरिता सहकार्य करावे, असे आवाहन कामगार उपायुक्त, रायगड- पनवेल, श्री.प्र.मा. पवार यांनी केले आहे.

# किल्ले सुधागडावरील महादरवाजाला चढले नवे कोंदण

## बुरुज व दरवाजांची साफसफाई ; बा रायगड परिवाराची श्रमदान व गडसंवर्धन मोहीम फत्ते

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

बा रायगड परिवारातर्फे किल्ले सुधागडावर दोन दिवशीय श्रमदान व गडसंवर्धन मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेत महादरवाजाला वॉर्निश लावून साफसफाई करण्यात आली. तसेच बुरुज व दरवाजांची साफसफाई आणि पाण्याची टाके स्वच्छ करून इतरही संवर्धनाची कामे करण्यात आली. शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून मोहीम राबविण्यात आली .

या मोहिमेत सहभागी संख्या जास्त असल्यामुळे आणि वेगवेगळ्या शहरातून सर्वजण आल्यामुळे कोरोना ची स्थिती लक्षात घेता वेगळ्या वेगळ्या टीम बनवून काम करण्यात आले. यावेळी गोमुखी कातळशिल्पात जडवलेल्या महादारवाज्याला वूड पॉलिश लावण्यात आले. चिलखती बुरुजाच्या वर असलेलं टाकं आणि वाड्यातून चोरदिंडीत जाताना वाटेत असलेल्या पाण्याच्या टाक्यामधील पाणी काढुन त्यातला गाळ व कचरा काढून साफ करण्यात आला. तसेच चोर दिंडी कडील बुरुज व महादरवाजा जवळील तटबंदीवर वाढलेली झाडेझुडपे तोडून साफसफाई करण्यात आली. हे काम अतिशय जोखमीचे होते. या बरोबरच महारवाज्याच्या वर बाजूस पडणाऱ्या पाण्याचा मार्ग बदलण्यात आला तिथे चर काढण्यात आले.

अश्या प्रकारे ही श्रमदान व संवर्धन मोहीम यशस्वीपणे राबिवण्यात आली. या मोहिमेत शेखर तांबट, मनोज थिटे व साई व्हावळ यांच्यासह बा रायगड परिवारातील सदस्य सहभागी झाले होते.



# छताचे काम करताना खाली पडून कामगाराचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा एमआयडीसी मधील दिव्यश्री पॅकेजिंग सप्लायर्स या कंपनीतील छताच्या डागडुजीचे काम करताना सिमेंटचा पत्रा तुटल्यामुळे १५ फुट उंचीवरुन खाली पडलेल्या मंजिल सैकिया (२७) या कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती.

या कामगाराला दिव्यश्री पॅकेजिंग सप्लायर्स या कंपनीच्या मॅनेजरने सुरक्षिततेच्या दृष्टीने कुठल्याही प्रकारची साधने पुरविली नसल्यामुळे सदरची दुर्घटना घडल्याचे तपासात आढळून आले आहे. त्यामुळे तळोजा पोलिसांनी सदर घटनेला कंपनीचा मॅनेजर शांताराम संभाजी पवळे याला जबाबदार धरुन त्याच्या विरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे. सदर घटनेतील मृत मंजिल सैकिया तळोजा येथील घोटचाळ येथे पत्नीसह राहत होता. मंजिल याला तळोजा एमआयडीसीतील दिव्यश्री पॅकेजिंग सप्लायर्स या कंपनीतील छताच्या डागडुजीचे काम करण्यासाठी कंपनीच्या मॅनेजरने बोलावले होते.

त्यानुसार मंजिल आणि त्याचे इतर तीन साथिदार दिव्याश्री कंपनीच्या छताचा डागडुजी करण्यासाठी चढले होते. याचवेळी कंपनीच्या छतावरील सिमेंटचा पत्रा तुटल्याने त्यावर उभा असलेला मंजिल सैकिया १५ फुट उंचावरुन खाली पडला. त्यामुळे तो गंभीर जखमी झाल्याने त्याला एमजीएम हॉस्पीटलमध्ये नेण्यात आले होते. मात्र, तेथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. सदर घटनेनंतर तळोजा पोलिसांनी आकस्मिक मृत्युची नोंद करुन तपास सुरु केला होता. या तपासादरम्यान दिव्यश्री पॅकेजिंग सप्लायर्स कंपनीच्या मॅनेजरने छतावर काम करण्यासाठी चढलेल्या कामगारांना सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारच्या सोयी-सुविधा आणि साधने दिली नसल्याचे आढळून आले.

त्यामुळेच सदरची दुर्घटना घडल्याचे तपासात आढळून आले आहे. त्यामुळे तळोजा पोलिसांनी मंजिल सैकिया याच्या मृत्युला कंपनीचा मॅनेजर शांताराम पवळे याला जबाबदार धरुन त्याच्या विरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, सदर प्रकरणात स्वत: पोलीस उपनिरीक्षक कृष्णा वुटे यांनी फिर्याद दिली आहे.

# अतिवृष्टीचा इशारा : बोर्ली, नांदगाव मजगांवमध्ये जनजीवनावर परिणाम



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

राज्यात मान्सून सक्रिय झाला असून जिल्हाधिकारी-रायगड यांनी दि.१० व दि.११ जून रोजी अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर दिलेल्या आदेशानुसार मुरुडसह बोर्ली-मांडला, नांदगाव मजगांव परीसरात मेडिकल स्टोअर्स वगळता पुर्णपणे बंद दिसून आला.

बोर्ली-मांडला नांदगाव मजगांव परीसरात पहाटे पहाटे सकाळी पुर्णपणे ढगाळ वातावरण होते तर काही ठिकाणी ब-यापैकी पाऊस पडला.अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी यांनी दि.१० व दि.११ जून दोन दिवस अतिवृष्टीचा इशारा देण्यात आल्याने बाजारपेठ बंदमुळे पंचक्रोशीतील नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला.दुपारच्या वेळेत चांगली उघडिप पडून ऊन पडल्याने रस्त्यावर तुरळक प्रमाणात वर्दळ दिसून आली.

कोरोना महामारी, निसर्ग,तौक्ते चक्रिवादळामुळे सर्व जण हैराण झाले असून त्यात भरीसभर अतिवृष्टीचा इशारा देण्यात आल्याने अडचणीत भर पडली असून याचा जनजीवनावर परिणाम दिसून आला.

# मुरुड तालुक्यातील नांदगाव येथे ट्रकची मेडिकल स्टोअर्सला धडक

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यातील नांदगाव बाजारपेठेतील धोकादायक अरुंद वळणावर नांदगाव कोळीवाड्याकडून मुरुड कडे जाणारा ट्रक क्रमांक एम एच १२ एफ झेड ४७८१ या ट्रक ने पावसामुळे ब्रेक फेल झाल्याने झोंबडकर मेडिकल स्टोअर्स ला जोरदार धडक दिली असून मेडिकल स्टोअर्सचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

लॉकडाउन मुळे रस्त्यावर शुकशुकाट असल्याने जीवित हानी टळली आहे, सदरचे वळण अतिशय अरुंद व धोकादायक असल्याने येथे नेहमीच वाहतूक कोंडी व अपघात घडत असतात.

# पनवेल महानगरपालिका

## जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | संतोष वसंत वाणी, वसंत स्मृती १०८/१, कफ रोड, पनवेल | १ जांभूळ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील वसंत स्मृती, नम्रता पार्क को.हौ.सोसायटी आवारातील जांभुळीचे झाड वादळामुळे पूर्ण वाकले असून कधीही पडू शकते. त्यामुळे जिवीत व वित्तहानी होवू शकते म्हणून सदर झाड तोडण्यास लवकरात लवकर परवानगी मिळावी ही विनंती. तसेच बाजूची दुसरे झाडे (आंबा, जाम, अशोक) ही झाडे उंच वाढली असून ती छाटण्याची परवानगी मिळावी. तरी १ जांभुळाचे झाड तोडणेकामी परवानगीबाबत. |
| २ | श्रीकांत पाटील, शरयु टु व्हीलर्स प्रा.लि., प्लॉट ७० आणि ७९ पनवेल | १ सुरू | पनवेल महानगरपालिका हद्दीतील शरयु टु व्हीलर्स प्रा.लि.प्लॉट ७० आणि ७९ पनवेल येथील आमच्या आवारात सुरूचे आणि रेन ट्री झाड आहे. हे दोन्ही झाडे आणि त्यांच्या फांद्या धोकदायक बनल्या आहेत आणि त्या पडतात. यामुळे पादचाऱ्यांना अडचणीही उद्भवू शकतात. जास्त प्रमाणात वाढलेल्या झाडाच्या फांद्या कोणत्याही वेळी पडतात. म्हणून आम्ही आपणास विनंती करून देवू की कृपया तातडीने आपण लवकरात लवकर झाड तोडा व झाडांच्या फांद्या ट्रीम करा. तरी १ सुरूचे झाड तोडणेकामी परवानगीबाबत. |
| ३ | महेंद्र रमेश घरत, बळीराम माणिक घरत सर्वे नं.२६३/०, धानसर पो.तळोजा, ता.पनवेल | १ चिंच | पनवेल महानगरपालिका हद्दीतील धानसर येथील पूर्वापार ग्रामस्थ असून माझ्या राहत्या घरा पाठीमागे श्री.मनोहर माणिक घरत आणि इतर ३ यांचे चिंचेचे झाड फार पूर्वीचे अंदाजे ६० वर्षाचे जुने वृक्ष घरावर पडण्याच्या स्थितीत असून झाडाची मुळे बुंध्या जमिनी पासून सुकला आहे. आणि झाडाचा पूर्ण तोल माझ्या घरावर झुकलेला असून ते चिंचेचे झाड घरावर ह्या येत्या पावसामध्ये जमीन उन्मळून पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे घाचे नुकसान आणि जिवीतहानी होण्याची शक्यता आहे. तरी १ चिंचेचे झाड तोडणेकामी परवानगीबाबत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सदर न झालेल्या हरकती अगर सुचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

पमपा/उद्यान/२१२१/प्र.क्र.२६५/२०२१

दिनांक : ०८/०६/२०२१

**सही/-**
**सहा.आयुक्त**
**तथा**
**वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

# संक्षिप्त...

## ट्रकच्या धडकेने महिलेचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका ट्रकची धडक पाठीमागून होंडा ॲक्टीव्हा गाडीस बसल्याने सदर गाडीवर असलेली महिला गंभीररित्या जखमी होवून मयत झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील नितळस गावाकडे जाणाऱ्या फाट्याजवळील तळोजा एमआयडीसी भारत वजन काटा परिसरात घडली आहे.


चैताली महादेव पिलाने (२४) या कळंबोली ते एशियन प्रिलॉम इंडस्ट्रीज येथे त्यांच्याकडील होंडा ॲक्टीव्हा या दुचाकीवरुन जात असताना भारत वजन काटा येथे पाठीमागून येणाऱ्या ट्रकने त्यांच्या गाडीला धडक दिल्याने यात त्या जखमी होवून त्यांचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## रोहा तालुक्यात कोरोनाचा कहर एकाच दिवशी ७ रुग्णांचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यात पुन्हा कोरोनाचा वाढत्या कहरराने बुधवारी एकाच दिवशी सात रुग्णांचा उपचार दरम्यान बळी गेल्याने आता संपूर्ण रोहा तालुक्यात चिंतेची बाब निर्माण झाली आहे तर कोरोना रुग्णांच्या वाढत्या संख्येने अधिक धोका वाढत आहे त्यामुळे प्रशासकीय यंत्रणा व आरोग्य यंत्रणेकडून अधिक प्रमाणात उपाय योजनेची गरज आहे.

रोहा तालुक्यात मृत्यू दर वाढत असल्याने चिंताही वाढली आहे बुधवारी त्यात ४६ नवीन कोरोनाबाधित रुग्णांची नोंद झाली आहे. ९जुन रोजी सायंकाळी मिळालेल्या माहिती नुसार तालुक्यात नवीन ४६ रुग्णआढळले आहेत तर २३ रुग्ण कोरोनावर मात करून बरे होऊन घरी गेले आहेत परंतु दुर्दैवाने मात्र सात रुग्णांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला ही बाब मात्र रोहेकरांसाठी चिंतेची आहे त्यामुळे प्रशकीय यंत्रणेवर अधिक ताण निर्माण झाले आहे.



तालुक्यात कोरोनाचे ७६५ रुग्ण आता उपचार घेत असून कोविड १९ ने बाधित झालेले एकूण रुग्ण संख्या ६०९८ वर पोहचली तर आता पर्यंत १८४ रुग्णांचा उपचारा दरम्यान दुर्दैवाने मृत्यू झाला आहे. आरोग्य यंत्रणेच्या यस्ववी प्रयत्ना नंतर तसेच, स्वतःच्या इच्छाशक्ती व रोगप्रतिकार शक्तीच्या जोरावर आता पर्यंत रोहा तालुक्यात ५१४९ रुग्णांनी कोरोणावर यशस्वीपणे मात करत ठणठणीत बरे होत सुखरूप घरी असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# नेरळ-माथेरान घाट रस्त्यामध्ये धोकादायक ठिकाणी दरड प्रतिबंधात्मक जाळी बसविणे गरजेचे

**दै.रायगड नगरी । माथेन**

माथेरान हे निसर्गरम्य, वाहनमुक्त, प्रदूषणमुक्त आणि नैसर्गिक पर्यटन स्थळ असून समुद्रसपाटी पासून ८०३ मीटर म्हणजेच सुमारे २६३६ फूट इतक्या उंचीवर डोंगरमाथ्यावर वसले आहे. नेरळ मार्गे माथेरानला येण्यासाठी ७ किमी चा डोंगरातून येणार वळणावळणाचा घाट रस्ता आहे. या घाट रस्त्यातूनच नेरळ – माथेरान टॅक्सी सेवा, आणि 'कर्जत – नेरळ माथेरान– कर्जत' अशी मिनी बस सेवा दिवसभर कार्यरत असते. या व्यतिरिक्त खाजगी वाहन तसेच ट्रेकिंगच्या माध्यमातून पायी चालत येणारे पर्यटक यांचा देखील समावेश असतो. दरवर्षी सुमारे ७ ते ८ लक्ष पर्यटक माथेरानला येत असतात. यात पावसाळी पर्यटन करणा–यांची संख्या सुद्धा लक्षणीय असते.

सध्या तरी माथेरानला येण्यासाठी नेरळ–माथेरान हा एकमेव घाटरस्ता असून येथें यायला दुसरा पर्यायी रस्ता नाही. माथेरान मध्ये दरवर्षी किमान २०० ते ३०० इंच इतका प्रचंड पाऊस पडतो. हा घाट रस्ता सन २६ जुलै २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे दस्तुरी येथील चांगभले मंदिर येथे आणि अन्य चार ठिकाणी दरड कोसळून १५ दिवस बंद होता, आणि माथेरानकरांचे, बालकांचे व रुग्णांचे खूप हाल झाले होते.या प्रसंगानंतर एकूण १५ वर्षांचा कालखंड उलटून गेला आहे.दरवर्षी पडणाऱ्या पावसाचे प्रचंड पाणी डोंगरावरून वाहून गेले आहे आणि या कडेकपारी आता काही ठिकाणी ठिसूळ आणि सुटत चालल्या आहेत. तेव्हा या घाट



रस्त्यात काही धोकादायक ठिकाणी जीवितहानी टाळण्यासाठी नेट बसविणे अतिप्राधान्याचे असून गरजेचे आणि अतितातडीचे आहे.

जून २०१६ मध्ये या घाट रस्त्यातुन प्रवास करत असताना माथेरान येथील नागरिकाला गंभीर ईजा झाली होती. सन २०१७ रोजी सुध्दा अनेक वेळा दरड कोसळण्याचे प्रकार घडले आणि घाट रस्ता काही काळा करिता बंद होता. यावर्षी ही या घाटात अनेक ठिकाणी छोटे मोठे दगड आणि वृक्ष उन्मळून पडत आहेत. तसेच माथेरानला मोठ्या प्रमाणात होणाऱ्या पावसामुळे या घाटात पाण्याचे अनेक धबधबे आहेत. त्यामुळे नेरळ– माथेरान घाटामधील काही भाग हा अत्यंत धोकादायक झाला आहे. विशेष करून चांगभलेचे मंदिर, तेथे असणारे पहिल्या वळणावर असलेली दरड आणि वॉटर पाईपच्या वर असणारी दरड ही येत्या पावसाळ्यात कधीही पडून जीवित हानी होण्याची दाट शक्यता आहे. नुकताच पावसाळा सुरू झाला आहे आणि माथेरानचा हा एकमेव घाटरस्ता असल्याने आणि जिवीतहानी टाळण्यासाठी यापुढे तरी हे प्रकरण गांभीर्याने घेऊन संबंधित विभागाने तातडीने पुढाकार घ्यावा. आणि जे जे शक्य ते निदान धोकादायक ठिकाणी तरी युद्धपातळीवर कार्य पूर्ण करून यापुढे संभाव्य जीवितहानी टाळावी.

तेव्हा, ज्याप्रकारे खंडाळा – लोणावळा एक्सप्रेस हायवे लगत दरडी कोसळू नयेत म्हणून नेट बसवून रस्ता संरक्षित करण्यात आला आहे, त्याचप्रकारे नेरळ– माथेरान घाट रस्त्याचे नेट संरक्षण होणे तसेच इतर तातडीच्या दरड प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे हे अतिआवश्यक आहे, नाहीतर संभाव्य मोठा अपघात होऊन मोठी मनुष्य हानी होऊ शकते. तरी याबाबत या समस्येचे गांभिर्य लक्षात घेऊन संबंधीत खात्याने आपल्या स्तरावरून जलदगतीने संबंधित विभागास वेळीच आदेश द्यावेत आणि सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग किंवा एमएमआरडीए यांच्यामार्फत युद्धपातळीवर हे काम पूर्णत्वास नेल्याशिवाय पर्याय नाही. याकामी माथेरान नगरीच्या विद्यमान नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांनी २०१८ मध्ये सार्वजनिक बांधकाम मंत्री, खासदार श्रीरंग अप्पा बारणे मावळ मतदार संघ, विभागीय वन अधिकारी (DFO) अलिबाग, उप विभागीय अधिकारी कर्जत, तहसीलदार/ मा. अधीक्षक कर्जत माथेरान, मुख्याधिकारी यांना निवेदन दिले होते परंतु आजतागायत या धोकादायक दरडीना संरक्षण दिले गेले नाही त्यामुळे सद–रची बाब गांभीर्याने घेणे आवश्यक असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

> जर का ह्या पावसाळ्यात या धोकादायक दरडी पडून आर्थिक वा जिवित हानी झाली आणि हा एकमेव घाट रस्ता बंद होऊन माथेरानचे पर्यटन बंद झाले तर याला सर्वस्वी जबाबदार संबंधीत विभागातले अकार्यक्षम अधिकारी राह-तील. तेव्हा, नेरळ-माथेरान घाट रस्त्यामध्ये धोकादायक ठिकाणी दरड प्रतिबंधात्मक जाळी (नेट) बसविणे आणि ईतर जरुरीच्या उपाययोजना तातडीने कराव्यात.
>
> **नितीन विश्वनाथ सावंत,**
> **माथेरान वनसंवर्धन समिती सदस्य**

# नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटीलांचे नाव द्या : आ.रविशेठ पाटील

### ठाकरेंच्या नावाला पेणकरांचा तीव्र विरोध ; पेणमध्ये साखळी आंदोलन

**दै.रायगड नगरी । पेण**

नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाला आगरी समाजाचे दिवंगत नेते, भूमिपुत्र व लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव द्यावे अशी मागणी पेणचे भाजप आमदार रविशेठ पाटील यांनी पेण येथे झालेल्या साखळी आंदोलनात केली. यावेळी समस्त पेणकरांनी ठाकरे यांच्या नावाला तीव्र विरोध केला.

यावेळी नगराध्यक्षा प्रितम पाटील, युवा नेते वैकुंठ पाटील, गटनेते अनिरुद्ध पाटील, उपनगराध्यक्षा वैशाली कडू, तालुका अध्यक्ष श्रीकांत पाटील, सरपंच पूजा पाटील, गोरख पाटील, अशोक पाटील, भास्कर पाटील यांसह पेण पालिकेचे नगरसेवक, नगरसेविका, सरपंच व पेण मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजप आमदार रविशेठ पाटील यांच्या निवासस्थानापासून तहसील कार्यालयापर्यंत हे साखळी आंदोलन करण्यात आले या आंदोलनात शेकडो



नागरिकांनी सहभाग घेतला होता. यावेळी मार्गदर्शन करताना रवीशेठ पाटील म्हणाले की, ज्या व्यक्तीने स्थानिक शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याकरिता प्रयत्नांची पराकाष्टा केली. त्यांच्या आंदोलन व प्रयत्नांमुळेच आज येथील शेतकऱ्यांना साडेबारा टक्के भूखंड मिळाला. आश्या अहोरात्र कष्ट घेणाऱ्या व्यक्तीचे नाव नवी मुंबई विमानतळाला दिलेच पाहिजे अशी भूमिका रवीशेठ पाटील यांनी घेतली. नवी मुंबई उभारताना स्थानिक शेतकरी, प्रकल्पग्रस्त, मिठागर कामगार, आगरी जनता यांच्यासाठी दि.बा.पाटील यांनी आंदोलन करून न्याय मिळवून दिला. सामान्य जनतेसाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. अशा झुंझार व लढवय्या नेत्याचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे यासाठी हे साखळी आंदोलन करण्यात असल्याची माहिती नगराध्यक्ष प्रीतम पाटील यांनी यावेळी दिली. आंदोलन आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाने तहसील कार्यालयात निवेदन देऊन शासनाकडे नवी मुंबई विमानतळाला दि.बा.पाटील यांचेच नाव लावण्याची लेखी मागणी केली.

# शिवाश्रम वृध्दाश्रमातील लसीकरणाच्या विशेष सत्रास पालकमंत्री अदिती तटकरे यांची भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्यावतीने खारघर येथील भार्गवी शंकर चॅरिटेबल ट्रस्टच्या शिवाश्रम या वृध्दाश्रमामध्ये आज (१० जून) लसीकरणाच्या विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या लसीकरण सत्रास पालकमंत्री आदिती तटकरे, नगरसेवक सतिश पाटील,आयुक्त सुधाकर देशमुख यांनी सदिच्छा भेट दिली.

पनवेल महानगरपालिकेच्यावतीने कोव्हिड लसीकरणाला गती दिली जात आहे. खारघर येथील शिवाश्रम वृध्दाश्रम हे निराधार लोकांसाठी चालवले जाणारे वृध्दाश्रम आहे. या ठिकाणचे बरेचसे जेष्ठ नागरिक हे बेडवर झोपून असतात तसेच काही जेष्ठ नागरिक लसीकरण केंद्रावर जाऊन लस घ्यायला जाण्यास असमर्थ आहेत. कोव्हिड लसीकरणामध्ये समाजातील सर्व घटकांतील जेष्ठ



नागरिकांना सामावून घेण्याच्या दृष्टीने आयुक्त सुधाकर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष लसीकरणाचे सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

खारघर सेक्टर १२ मध्ये असणाऱ्या या वृध्दांश्रमामधील वृध्दांकडे आपले आधारकार्ड सारखे ओळखपत्र देखील नाही. मानवतेचा दृष्टीकोन जपत आज येथील २९ जेष्ठ नागरिकांचे कोव्हिड लसीकरण करण्यात आले. या विशेष सत्रास पालकमंत्री आदिती तटकरे यांनी भेट देऊन लसीकरणाचा आढावा घेतला. तसेच येथील जेष्ठ नागरिकांची विचारपूस केली.यावेळी उपायुक्त सचिन पवार, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, डॉ. मनिषा चांडक,डॉ.सुरेश पंडित आणि शिवाश्रम वध्दाश्रमाचे संचालक मधुसूदन आचार्य उपस्थित होते.

# अतिवृष्टीमुळे जाहीर केलेल्या लॉकडाऊनचा श्रीवर्धनमधील व्यापाऱ्यांना फटका ; श्रीवर्धनमध्ये तुरळक पावसाची हजेरी

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

संपूर्ण कोकण किनारपट्टी सह मुंबई, पालघर व ठाणे जिल्ह्यात अतिवृष्टी होईल असा अंदाज राज्याच्या हवामान खात्याने वर्तविला होता. अंदाज वर्तविल्या प्रमाणे नऊ तारखेला मुंबई, पालघर परिसरात जोरदार पाऊस देखील पडला. पनवेल, नवी मुंबई, मुंबई, मुंबई उपनगर, वसई, विरार, नालासोपारा या परिसरात अतिवृष्टीमुळे रस्त्यांना नदीचे स्वरूप आले होते. रायगड जिल्ह्यात देखील नऊ तारखेला चांगला पाऊस झाला. परंतु हा पहिलाच पाऊस असल्याने कोठेही पाणी तुंबण्याचे किंवा पाणी साठुन राहूण्याचे प्रकार घडले नाहीत. कारण पाऊस सुरू झाल्यापासून अद्याप जमीन दोन फूट देखील पूर्णपणे भिजलेली नाही. त्यामुळे पडलेले पावसाचे पाणी पूर्णपणे जिरून जात आहे. मोठ्या शहरामध्ये वाढते काँक्रिटीकरण व रस्त्यांचे काँक्रिटीकरण यामुळे पाणी जमिनीत जिरत नसल्यानेच थोडा पाऊस झाला तरी रस्त्यांना नद्यांचे स्वरूप प्राप्त होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी दोन दिवसांचा लॉकडाऊन जाहीर करताना ज्या ठिकाणी जास्त पावसाचा जोर असेल त्या ठिकाणच्या स्थानिक प्रशासनांना त्यावरती निर्णय घेण्याचे अधिकार देणे अनिवार्य होते. म्हणजे ज्या परिसरात पूरसदृश्य परिस्थिती असेल किंवा पाणी तुंबलेले असेल त्या परिसरातील दुकाने, बाजारपेठा बंद करण्याचे अधिकार संबंधित प्रांत अधिकारी व तहसीलदार यांना देणे क्रमप्राप्त होते. परंतु सरसकट संपूर्ण रायगड जिल्ह्यात लॉकडाउन जा–हीर केल्यामुळे श्रीवर्धन शहरात अत्यल्प पाऊस पडून देखील या ठिकाणी अगोदरच कोरोनाव्हायरसच्या लॉकडाऊन मुळे त्रस्त असलेल्या व्यापाऱ्यांना विनाकारण आपली दुकाने बंद ठेवावी लागली. श्रीवर्धन मध्ये समुद्र खवळलेला असला तरीही दहा तारखेला रात्री काही प्रमाणात पावसाच्या सरी कोसळल्या. मात्र सकाळपासून अत्यंत कमी प्रमाणात पाऊस पडला आहे. वृत्तवाहिन्यांवरून प्रसारित होणाऱ्या पाऊस पडण्याचा अंदाज यामुळे नागरिकांच्या मनात भीती उत्पन्न होते. या अगोदर देखील कोकणात आठ दिवस सतत पाऊस पडत असे. परंतु त्या वेळी प्रसारमाध्यमे, दूरदर्शन उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना त्या पावसाचे काहीही वाटत नसे. परंतु आता वृत्तवाहिन्यांवर, आता भरतीची वेळ आहे. चार मीटर उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता, अशा प्रकारची वृत्त सतत प्रसिद्ध होत असल्याने नागरिकांच्या मनात विनाकारण भीती उत्पन्न होते. किनारपट्टीच्या भागात पूरपरिस्थिती केव्हाही नसते. पेण, सुधागड, माणगाव, महाड याठिकाणी अतिवृष्टीमुळे अनेक वेळा पूरपरिस्थिती उद्‌भवते. ११ जून रोजी या ठिकाणी पाऊस न पडल्यास प्रशासनाने या ठिकाणची बाजारपेठ ठरलेल्या वेळेमध्ये उघडी ठेवण्यास परवानगी द्यावी अशी मागणी व्यापारीवर्ग मधून होत आहे.

# पटवर्धन वाडा येथे काँक्रीटीकरण कामाचे नगरसेविका रुचिता लोंढे यांच्या हस्ते भूमीपूजन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेच्या नगरसेवकांच्या माध्यमातून नागरीकांना समसम्या जाणून त्या साडविण्याचे तसेच त्यांना विविध सुवीधा देण्याचे काम सातत्याने करण्यात येत आहे. त्याअंतर्गत नगरसेविका रुचीता लोंढे यांच्या नगरसेविक निधीमधून प्रभाग क्रमांक १९ मधील पटवर्धन वाडा येथील गल्लीमध्ये स्टँम्प काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. या कामाचे भुमीपूजन नगरसेविका रुचीता लोंढे यांच्या हस्ते करण्यात झाले.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १९ मधील नगरसेवाकांच्या माध्यामातून अनेक विकासाची कामे करण्यात येत आहे. त्याअंतर्गत प्रभाग क्रमांक १९ मधील पटवर्धन वाडा या गल्लीमध्ये ५ सोसायट्यांमध्ये असून, या ठिकाणच्या नागरीकांच्या रस्त्यासंदर्भात अणेक समसम्या होत्या. त्यापार्श्वभुमीवर नगरसेविका रुचीता लोंढे यांच्या नगरसेवक निधीमधून पटवर्धन वाडा येथील गल्लीमध्ये स्टँम्प काँक्रिटीकरणाचे काम करण्यात येणार आहे. या कामांचे मान्यवरांच्या हस्ते भुमीपूजन करण्यात आले. या वेळी नगरसेवक अनिल भगत, राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, नंदा ओझे, शरद सोमण, योगेश जोगळेकर, अनिमेष पटवर्धन, दशरथ चोरघे, श्री निजमपुरकर, तुषार कप्रे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## भटक्या कुत्र्यांनी केला मुलावर हल्ला


**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका अनेक भागात भटक्या व मोकाट कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कुत्र्यांची दहशत नागरिकांच्या जीवावर बेतली असून एका मोकाट कुत्र्याने १२ वर्षाच्या मुलावर जबरी हल्ला करून त्याला गंभीरपणे जखमी केल्याची घटना तळोजा येथे घडली आहे.



जखमी झालेल्या मुलाचे नाव आयान काझी असे आहे. तळ–ोजा गावातील मोकाट कुत्र्यांच्या दहशतीमुळे नागरिकांना, महिलांना, वृद्धांना व मुलांना घरातून बाहेर एकटे पडणे मुश्कील झाले आहे. ही मोकाट कुत्री गटागटाने एकत्र फिरतात. लॉकडाऊनमध्ये त्यांना बाहेर पुरेसे खायला मिळत नसल्याने ते आक्रमक होत चालले आहेत. त्यामुळे ते रस्त्यावरुन कोणी सामान घेवून जाताना दिसल्यास किंवा फिरताना दिसल्यास त्यांच्यावर हल्ला करतात व पिशवीतील खाद्य हिसकावून पळून जातात. तरी याबाबत पनवेल महानगरपालिकेने ठोस उपाय योजना करावी अशी मागणी तळोजा परिसरातील रहिवाशी करीत आहेत.

## म्हसळ्यात धोकादायक इमारती सील, मुख्याधिकाऱ्यांची कारवाई



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

भारतीय हवामान खात्याने दिनांक ९ जुन ते १२ जुन २०२१ या कालावधीत अतिवृष्टीचा इशारा दिला असल्याने जिवीत व वित्त हानी टाळण्यासाठी जिल्हाधिकारी रायगड–अलिबाग कार्यालयाद्वारे धोकादायक इमारतींवर कारवाई करण्याचे आदेश दिले असता त्या अनुषंगाने म्हसळा नगर पंचायत हद्दीतील बाजारपेठ परिसरातील ३ आणि सोनारआळीतील २ अशा ५ इमारती म्हसळा नगर पंचायत व पोलीस प्रशासनाने सिल केल्या आहेत.

कारवाई बाबत सविस्तरपणे माहिती घेतली असता म्हसळा नगर पंचायत हद्दीतील तालुका शहरात एकुण ११ इमारती धोकादायक असल्याचे निदर्शनास आल्याने कोणतीही आपत्कालीन घटना घडु नये,कोणत्याही प्रकारची जीवित व वित्त हानी होऊ नये या करिता इमारतीच्या संबंधित मालकांना दुरुस्ती किंवा नवीन बांधकाम करण्यासाठी नगर पंचायती मार्फत आगाऊ नोटीस देण्यात आली होती.तसेच सदर इमारतींच्या मलकाविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला होता असे म्हसळा नगर पंचायतीचे मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी माहिती देताना सांगितले.